# जिल्हा युवा महोत्सवावर विवेकानंदची मोहर

## युवा महोत्सवात आजरा, न्यू, राजाराम महाविद्यालयांची प्रभावी कामगिरी

जयसिंगपूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाचा जिल्हास्तरीय युवा महोत्सव जयसिंगपूर येथे बुधवारी झाला. यामध्ये येथील विवेकानंद महाविद्यालयाने वादविवाद, सुगम गायन, लोकवाद्य वृंद, मूकनाट्य अशा बहुतांशी स्पर्धेत क्रमांक पटकावून आपली मोहर युवा महोत्सवावर उमटवली.

आजरा महाविद्यालय, न्यू कॉलेज, राजाराम कॉलेज यांनीही चांगली कामगिरी केली. क्रमांक आलेल्या सर्व महाविद्यालयांची निवड फलटण यथे मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी झाली आहे. २६ ते २८ सप्टेंबर या कालावधीत हा महोत्सव मुधोजी महाविद्यालयात होणार आहे.

जयसिंगपूर येथील डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सव झाला. त्याचा निकाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एस. सावंत यांनी जाहीर केला आहे. निकाल पुढीलप्रमाणे :

**वक्तृत्व मराठी** - प्रथम - दि न्यू कॉलेज, कोल्हापूर, द्वितीय - राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर, तृतीय - श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी.

**वक्तृत्व हिंदी** - प्रथम - डी. आर. माने महाविद्यालय, कागल, द्वितीय - सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, तृतीय - महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.

**वक्तृत्व इंग्रजी** - प्रथम - सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, द्वितीय - डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, तृतीय - देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर.

**वादविवाद** - प्रथम - दूध सागर महाविद्यालय, बिद्री, द्वितीय - विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर. तृतीय - डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर.



**जयसिंगपूर : युवा महोत्सवात लोककला सादर करताना विद्यार्थिनी.**

**सुगम गायन** - प्रथम - विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, द्वितीय - श्री शिव शाहू महाविद्यालय, सरुड, तृतीय - श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी.

**लोकवाद्यवृंद** - प्रथम - विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, द्वितीय - डी. आर. माने महाविद्यालय, कागल, तृतीय - देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर.

**समूहगीत भारतीय** - प्रथम - विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, द्वितीय - राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर, तृतीय - दि न्यू कॉलेज, कोल्हापूर.

**लोककला** - प्रथम - दत्ताजीराव कदम आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी, द्वितीय - महावीर महाविद्यालय, कोल्हापूर, तृतीय - दि न्यू कॉलेज, कोल्हापूर.

**लोकनृत्य** - प्रथम - आजरा महाविद्यालय, द्वितीय - श्री शिव शाहू महाविद्यालय, सरूड, तृतीय - विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**मूकनाट्य** - प्रथम - विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, द्वितीय - देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर, तृतीय - दूध साखर महाविद्यालय, बिद्री.

**लघुनाटिका** - प्रथम - विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, द्वितीय - भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर, तृतीय - देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर. **पथनाट्य** - प्रथम - दूध साखर महाविद्यालय, बिद्री, द्वितीय - विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर, तृतीय - शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, यड्राव. **एकांकिका** - प्रथम - भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिरिअरिंग, कोल्हापूर, द्वितीय - देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर, तृतीय -शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, यड्राव. **नकला** - प्रथम - राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर, द्वितीय - आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज कोवाड, तृतीय - सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 SEP 2019
तरुण भारत



जयसिंगपूर : शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात आजरा महाविद्यालयाने सादर केलेल्या लोकनृत्यातील एक मुद्रा.

# आजरा महाविद्यालयाचे लोकनृत्य जिल्हास्तरीय युवा महोत्सवात प्रथम

**प्रतिनिधी**
आजरा

शिवाजी विद्यापीठाच्या यंदाच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात आजरा महाविद्यालयाने सादर केलेल्या करघआट्टम लोकनृत्याला प्रथम क्रमांक पटकाविला. जिल्हास्तरावर सलग चौथ्यावर्षी प्रथम क्रमांक पटकाविण्याचा मान मिळवून आजरा महाविद्यालयाने आपला वेगळा ठसा उमटविला आहे.

जयसिंगपूर येथील जे. जे. मगदूम इंजिनिअरींग कॉलेजमध्ये यंदाचा युवा महोत्सव पार पडला. आजरा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लोकनृत्यामध्ये विद्या मोरबाळे, वर्षा कांबळे, धनश्री सुतार, उषा पाटील, सुनेत्रा कुंभार, निकिता तरडेकर, शशिकला गोंधळी, शिल्पा यादव, किरण वांद्रे, संग्राम येरूडकर या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. लोकनृत्याचे दिग्दर्शन मुंबई येथील अमित घरत यांनी केले. डॉ. आनंद बल्लाळ, प्रा. रमेश चव्हाण, आय. के. पाटील, मिनाक्षी दोडमनी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशामुळे २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान फलटण येथील मुधोजी महाविद्यालयात होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवात हे लोकनृत्य सादर होणार आहे. जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अशोक चराटी तसेच संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. एम. एल. होनगेकर यांनी अभिनंदन केले.

# हुंदका आवरत चढवला स्वरांना साज

## काजल नरुटेला साकारायचंय ब्रह्मनाळ दुर्घटनेतील दिवंगत आईचे स्वप्न

**संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : 'महापुरात बोट उलटली. आई व बहिणीचा डोळ्यांसमोर मृत्यू झाला. आजही घरी एकटी असले की, आई व बहीण घरात असल्याचा भास होतो. त्यांच्या आठवणीने गहिवरून येतं. हुंदकाही आवरता येत नाही. आईचं स्वप्न होतं की, मी मोठी गायिका व्हावं. त्यामुळेच आई व बहिणीच्या मृत्यूनंतर पंधराव्या दिवशी सांगलीतील एका कार्यक्रमात माझा हुंदका आवरून स्वरांचा साज चढवला. आता मी ठरवलंय की, आईचं स्वप्न पूर्ण करेपर्यंत डोळ्यांतील अश्रूंना थांबवायचं.' दीड महिन्यापूर्वी महापुरात ब्रह्मनाळ येथे बोट उलटून झालेल्या अपघातातील नरुटे कुटुंबातील काजल नरुटे आपल्या भावना व्यक्त करत होती.

महापुराचे पाणी ब्रह्मनाळमध्ये शिरले होते. गावातील लोकांना सुरक्षित ठिकाणी नेण्यात येत होते.

पान ७ वर »



सांगली : येथे संगीत मैफलीत गायन करताना काजल नरुटे.

## तरससदृश प्राण्याचा घरपण येथे वावर

कळे, ता. २० : घरपण (ता. पन्हाळा) येथे तरससदृश प्राण्याने कुत्र्याची पिले पळवली. दुपारी चारच्या सुमारास ही घटना घडली. ग्रामस्थांनी वन विभागाला कळविले आहे. घरपण येथील सोनारमाळ परिसरात आनंदा बंडू मोळे यांचा जनावरांचा गोठा आहे.

याठिकाणी महादेव मारुती मोळे यांची कुत्री आपल्या पाच पिलांसह वास्तव्यास होती. दुपारी चारच्या सुमारास तरससदृश प्राण्याने ही पाचही पिले व याच परिसरातील दादासो रामचंद्र मोळे यांचे एक कुत्र्याचे पिलू पळवून नेले.

# हुंदका आवरत चढवला स्वरांना साज

» पान १ वरून

काजलची आई सुरेखा, बहीण कोमल, चुलत आजी, मामी सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी बोटीत बसल्या. बोटीत जागा नसल्याने काजल घराच्या दारातच थांबली. काही अंतरावर बोट गेल्यानंतर टर्न घेताना ती उलटली. काहीतरी घडल्याचं काजलला दिसत होते. पाण्याला ओढ असल्याने काही करताही येत नव्हते. या अपघातात नरुटे कुटुंबीयातील सतरा जणांचा मृत्यू झाला. त्याचा धक्का काजलला बसला. ती आई व बहिणीच्या मृत्यूने सैरभैर झाली. घरात बसल्यानंतरही तिला त्यांची आठवण सतावू लागली. अशातच गणेशोत्सवादरम्यान सांगलीत गायनाचा कार्यक्रम आला. स्वतःला दुःखातून सावरायच तर गायनातून आईचं स्वप्न पूर्ण करायच,




**काजल नरुटे**

असे ठरवून ती आई व बहिणीच्या मृत्यूनंतर पंधराव्या दिवशीच स्टेजवर गायली.

काजलचे प्राथमिक शिक्षण ब्रह्मनाळ विद्यालय, तर राणी सरस्वती कन्या महाविद्यालयातून ती बारावी उत्तीर्ण झाली. सांगलीवाडीतील पतंगराव कदम कॉलेजमधून तिने बी.एस्सी. (फिजिक्स) पदवी मिळवली.

तिला लहानपणापासूनच गायनाची आवड. रेडिओ व टीव्हीवरील हिंदी, मराठी गाणी ऐकत ती लहानाची मोठी झाली. कोणतेही शास्त्रीय शिक्षण न घेताही तिचे गोड गाणे ऐकण्यासाठी आई आतुर असायची. काही वर्षांपूर्वी तिने एम. आर. सावंत यांच्याकडे क्लासिकल गायनाचे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. बीट टू बीट डान्सची ती नृत्यकला कलाकार आहे. ओंकार रोकडे यांच्याकडे तिने नृत्याचे धडे गिरवले आहेत. विशेष म्हणजे तिने महाविद्यालयीन जीवनात युवा महोत्सव गाजवला आहे.

काजलची बहीण कोमल बी. एस्सी.चे शिक्षण घेत होती. ती हुशार होती. तिचा मोठा भाऊ चंद्रशेखर सांगलीतील मार्केट यार्डमध्ये कामाला आहे. आता आम्ही दोघे एकमेकांचे आधार आहोत, असे काजल सांगते.

**युवा महोत्सवात मग्न**

शिवाजी विद्यापीठाच्या सांस्कृतिक पथकात तिने आपला करिष्मा दाखवला आहे. म्हैसूर येथे झालेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवात तिचा सहभाग असलेल्या लोकनृत्य प्रकाराने सुवर्ण, तर रांची येथे झालेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवात वेस्टर्न साँग प्रकारात सुवर्ण, इंडियन साँग व वन ॲक्ट् प्ले प्रकारात रौप्यपदक मिळवले आहे. इंदूर (मध्य प्रदेश) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवात फोक ऑर्केस्ट्रामध्येही तिचा सहभाग होता. काजलही युवा महोत्सवासाठी कलाकारांची तयारी करून घेत आहे.

# पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कमाफीसाठी स्वतंत्र कक्ष

## परीक्षा विभागाने संलग्नित महाविद्यालयांना पाठविले परिपत्रक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयांतील पूरबाधित गाव, भागातील विद्यार्थ्यांचे हिवाळी सत्रातील परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतला आहे. त्यानुसार उच्च शिक्षण संचालकांच्या निर्देशानुसार महाविद्यालयीन स्तरावर स्वतंत्र कक्ष स्थापन करून कार्यवाही करण्यात येणार आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत महापुराने जनजीवन विस्कळीत झाले होते. याचा फटका विद्यार्थ्यांसह शैक्षणिक संस्थांना बसला. त्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कमाफीचा निर्णय झाला असून परीक्षा विभागाने सर्व संलग्नित महाविद्यालये व पदवी व पदव्युत्तर अधिविभागांना परिपत्रक पाठविले आहे. परीक्षा शुल्क माफीचा लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्याने पूरबाधित, पूरग्रस्त असल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे शासकीय कागदपत्र, दाखला सादर करणे आवश्यक आहे. कागदपत्रे पडताळणी महाविद्यालयीन स्तरावर करण्यात येणार असून याचे अधिकार प्राचार्य, संचालक यांना देण्यात आले आहेत. ज्या पूरबाधित विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क अद्याप भरलेले नाही, अशा विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेण्यात येऊ नये.

पूरबाधित विद्यार्थ्यांचे अर्ज स्वतंत्रपणे सादर करताना त्यामध्ये शुल्कमाफी दिल्याबाबतचा उल्लेख करण्यात यावा. शुल्कमाफीसाठी पात्र ठरविण्याचे अधिकार अधिविभागप्रमुख, प्राचार्य, संचालक यांना देण्यात आले आहेत. त्यांनी कागदपत्रांची पडताळणी करून विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी केले आहे.




### स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करणे गरजेचे

हिवाळी परीक्षांचे अर्ज भरण्याची मुदत पूर्ण झाली आहे. त्यामुळे विहित वेळेत अर्ज भरण्याच्या दृष्टीने तीनही जिल्ह्यांतील पूरबाधित विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क महाविद्यालयामार्फत विद्यापीठाकडे भरणा केले आहे. अशा शुल्क माफीपात्र पूरबाधित विद्यार्थ्यांना त्यांनी शुल्क माफीपूर्वी भरणा केलेले परीक्षा शुल्क परतावा देण्यासाठी महाविद्यालयांनी स्वतंत्रपणे प्रस्ताव परीक्षा विभागाकडे सादर करणे गरजेचे आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 SEP 2019
तरुण भारत

# पूरबाधीत क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

- शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळाचा निर्णय
- हिवाळी सत्रातील परिक्षांचे शुल्क होणार माफ

पूरबाधीत क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील हिवाळी सत्रातील परीक्षांचे शुल्क माफ करण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतला आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांमधील पूरग्रस्त विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय घेतला आहे.

संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या निर्देशानुसार महाविद्यालयीन स्तरावर स्वतंत्र कक्ष स्थापन करून कार्यवाही करण्यात येणार आहे. परीक्षा शुल्क माफीसाठी पूरबाधित विद्यार्थ्यांनी पूरग्रस्त असल्याचे सक्षम शासकीय अधिकारी यांचे कागदपत्र, दाखला प्रत सादर करणे आवश्यक आहे. त्याची पडताळणी महाविद्यालयीन स्तरावर होणार आहे. पडताळणीचे अधिकार महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक यांना दिले आहेत. त्यांनी याबाबतची कार्यवाही शासननिर्देशानूसार करावी.

अद्याप ज्या पूरबाधित विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क भरणा केली नाही, त्यांच्याकडून परीक्षा शुल्क घेऊ नये. त्या विद्यार्थ्यांचे अर्ज स्वतंत्रपणे सादर करताना त्यामध्ये शुल्कमाफी दिल्याचा उल्लेख करावा. शुल्कमाफीसाठी पात्र ठरविण्याचे अधिकार अधिविभागप्रमुख, प्राचार्य, संचालकांना दिले आहेत. काही परीक्षांचे अर्ज भरण्याची मुदत पूर्ण झाली आहे. त्यामुळे वेळेत अर्ज भरण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क महाविद्यालयामार्फत विद्यापीठाकडे भरणा केले आहे. अशा शुल्कमाफीपात्र विद्यार्थ्यांना शुल्क परत देण्यासाठी महाविद्यालयांनी स्वतंत्र प्रस्ताव परीक्षा विभागाकडे तत्काळ सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दूरशिक्षणाच्या प्रवेशांना मुदतवाढ

## पूरस्थितीमुळे निर्णय; ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज भरण्याचे आवाहन

**कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रामार्फत बी.ए., बी.कॉम., एम.ए. (भाषा), एम.ए. (सामाजिक शास्त्रे), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) व पी. जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया जून ते ऑगस्ट या दरम्यान केली होती.**

तथापि शिवाजी विद्यापीठातील कार्यक्षेत्रातील संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयातील कोल्हापूर, सांगली, सातारा आदी जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण झालेली होती. त्यामुळे सदर प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ मिळावी, यासाठी कुलगुरू प्रा. (डॉ.) देवानंद शिंदे यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठपुरावा केला होता. त्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रवेश प्रक्रियेस ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमांना प्रवेशित व्हावे, असे आवाहन उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी केले.

ही प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन असून कोल्हापूर, सांगली, सातारा आदी जिल्ह्यांतील ८१ अभ्यास केंद्रांमध्ये विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, कामगार व बंदीजन आदी शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांना प्रवेशित होता येईल. विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता विद्यार्थ्यांनी निवडलेले अभ्यासकेंद्र हेच शक्यतो परीक्षा केंद्र म्हणून दिले जाते. प्रथम वर्ष नव्याने ऑनलाईन अर्ज सादर करताना ऑनलाईन अथवा ऑफलाईन शुल्क भरण्यासाठी विद्यार्थ्यांकडे बँकेची कागदपत्रे सोबत ठेवणे गरजेचे आहे. संपूर्ण ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत अभ्यास केंद्रावर जमा करण्याची मुदत नियमित शुल्कासह ३० सप्टेंबरपर्यंत आहे. जे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिलेले आहेत, अशांनी सदर अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावा, असे आवाहन दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी केले.



### अर्ज भरण्याविषयी

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने प्रवेश आणि परीक्षा अर्ज online.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर स्टुडंट पोर्टल या लिंकवर अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी स्वत:चा युजर आयडी व पासवर्ड तयार करून रजिस्ट्रेशन करणे गरजेचे आहे.

# पूरबाधित विद्यार्थ्यांचे हिवाळी सत्रातील परीक्षा शुल्क माफ

## अधिकार मंडळ बैठकीत निर्णयास मान्यता

कोल्हापूर, ता. २० : पूरबाधित परिसर व गावातील विद्यार्थ्यांचे हिवाळी सत्रातील परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत अधिकार मंडळाने निर्णय घेतला आहे. संलग्नीत महाविद्यालयांना तसा आदेशही दिला.

ऑगस्टमध्ये अतिवृष्टीमुळे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांतील पूरबाधित विद्यार्थ्यांचे हिवाळी सत्रातील परीक्षा शुल्क माफ करण्याची मागणी झाली होती. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठरावही केला होता.

परीक्षा शुल्क माफीचा लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी पूरग्रस्त असल्याचा दाखला, कागदपत्र सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने महाविद्यालयाकडे जमा करायचे आहे. त्याच्या पडताळणीचे अधिकार प्राचार्य आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकांना आहेत. ज्या पूरबाधित विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क अद्याप भरलेले नाही, त्यांच्याकडून शुल्क घेऊ नये. पूरबाधित विद्यार्थ्यांचे अर्ज स्वतंत्रपणे सादर करताना त्यात शुल्कमाफी दिल्याबाबतचा उल्लेख करावा. बऱ्याच हिवाळी परीक्षांचे अर्ज भरण्याची मुदत पूर्ण झालेली आहे. पूरबाधित विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क महाविद्यालयामार्फत विद्यापीठाकडे भरणा केले आहे, अशा शुल्कमाफीपात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क परत करण्यासाठी स्वतंत्रपणे प्रस्ताव पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 SEP 2019

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात एमफिल, पीएचडी प्रवेशपरीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील एमफिल, पीएचडी अभ्यासक्रमाची प्रवेशपरीक्षा सुरळीत



पार पडली. विविध विषयांसाठी ४५३६ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी ३६८१ विद्यार्थांनी परीक्षा दिली. ८५५ विद्यार्थी गैरहजर होते. कोल्हापूर, सांगली, साताऱ्यातील परीक्षा केंद्रांवर विविध विषयांसाठी ऑफलाईन पद्धतीने ही परीक्षा झाली. उर्वरित विषयांसाठी शनिवारपर्यंत परीक्षा सुरु राहणार आहे.

# एम.फिल., पीएच.डी. प्रवेश परीक्षा संपली

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध ४२ विषयांच्या एम.फिल., पीएच.डी. अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा शुक्रवारी संपली. तीन दिवसांत एकूण ३,६८१ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा दिली. विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारत (कोल्हापूर), कन्या महाविद्यालय (सांगली), यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (सातारा) या केंद्रांवर दिवसभरातील तीन सत्रांमध्ये परीक्षा झाली. विविध ४२ विषयांसाठी एकूण ४,५३६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ३,६८१ जणांनी परीक्षा दिली, तर ८५५ जण गैरहजर राहिले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून देण्यात आली.

# एम.फिल., पीएच.डी.साठी ३६८१ परीक्षार्थी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

एम.फिल., पीएच.डी.साठी घेण्यात आलेल्या परीक्षेसाठी आजअखेर ३६८१ विद्यार्थी उपस्थित होते. ८५५ विद्यार्थी अनुपस्थित राहिले.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ४२ विषयांच्या एम. फिल., पीएच. डी. प्रवेशप्रक्रियेचा शुक्रवारी शेवटचा दिवस होता. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील ही परीक्षा झाली. विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारत, कन्या महाविद्यालय, सांगली; यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा ही परीक्षा केंद्रे होती. परीक्षेला विद्यार्थांच्या उपस्थितीची टक्केवारी ८१.१५ होती, अशी माहिती परीक्षा विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

# विद्यापीठात आज एच.आर. मीट

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात उद्या (ता. २१) तंत्रज्ञान अधिविभागामध्ये 'एच.आर. मीट २०१९' चे आयोजन केले आहे. यात नामवंत कंपन्यांचे एच.आर. सहभागी होणार आहेत. याचा फायदा विद्यार्थी, शिक्षकांना होणार आहे, अशी माहिती अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. जयदीप बागी यांनी दिली आहे. प्रामुख्याने उद्योजक जगतामध्ये टेक्निकल स्किल, कम्युनिकेशन स्किल, प्रोफेशनल्स स्किल आवश्यक असतात. याबाबतचे मार्गदर्शन मीटमधून मिळणार आहे. विविध चर्चासत्रांतून उद्योग जगतातील संधी, त्यासाठी लागणारे गुण यांबाबतची माहिती विद्यार्थी, शिक्षकांना येथे मिळेल. डेन्ट फ्लो टेक्नॉलाजिस (कोल्हापूर), पीएसपी पंप्स (कोल्हापूर), इंडो स्कॉटल ऑटो पार्टस् (पुणे), विनती ऑरगनाइझ (खेड) यांच्याह राज्यातील नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. या मीटचे आयोजन डॉ. बागी, डॉ. एस. बी. सादळे यांनी केले आहे.

# तंत्रज्ञान अधिविभागात आज 'एचआर मीट'

**कोल्हापूर (प्रतिनिधी ) :** शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाच्या वतीने शनिवारी (दि. २१) 'एचआर मीट-२०१९'चे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात विविध कंपन्यांचे एचआर मॅनेजर उपस्थित राहणार आहेत. अभियांत्रिकीचे विद्यार्थी आणि उद्योजक संवाद साधणार आहेत. याप्रसंगी विद्यार्थ्यांना कौशल्य मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन संचालक प्रा. डॉ. जयदीप बागी यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 SEP 2019

तरुण भारत

# विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांचे यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात संगणकशास्त्र आणि तंत्रज्ञान शाखेतील अंतिम वर्षातील (२०१९-२०२०) विद्यार्थ्यांची निवड देशातील अग्रगण्य आयटी इंडस्ट्रीमध्ये झाली. विश्वजीत घाटगे व प्रसाद चौधरी या विद्यार्थ्यांची परसिस्टंट प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत निवड झाली. तसेच वृषाली सावंत, हर्षवर्धन पाटील व प्रसाद चौधरी हे विद्यार्थी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, पुणे येथे निवड झाली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रभारी कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# ओझोन दिनानिमित्त विद्यापीठात पथनाट्य



जागतिक ओझोन दिनाच्या औचित्याने शिवाजी विद्यापीठात वन वणवा हे पथनाट्य सादर करताना पर्यावरणशास्त्र विभागाचे विद्यार्थी.

कोल्हापूर टाइम्स टीम

जागतिक ओझोन दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे वन वणवा या विशेष पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. वृक्षतोड रोखून रोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश या पथनाट्यातून देण्यात आला. यावेळी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

ओझोन दिनानिमित्त अधिविभागाद्वारेही विविध उपक्रम, स्पर्धा आदींच्या माध्यमातून याविषयी जागृती करण्यात आली. पथनाट्याचे लेखन डॉ. योजना पाटील यांनी केले, तर अस्मिता पाटील, अभिजित मोरे यांनी गीतलेखन केले. या पथनाट्यात राहुल घट्टे, अनुजा जाधव, वैशाली देसाई, रुपाली उपळकर, मयुरी गोसावी, ज्योती कांबळे, महेश चव्हाण, अक्षय पाटील आणि प्रेरणा घेवारी यांनी सहभाग घेतला. वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, पर्यावरण अधिविभाग प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, आयक्यूएसीचे संचालक डॉ. आर. के. कामत, डॉ. आसावरी जाधव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 SEP 2019

Times of India

# SUK extends application deadline

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has extended its deadline to submit the exam application form to September 30.

In a circular issued on Thursday, the university said students can avail the facility by paying a fine of Rs 50 per day after September 18 along with the super late fee.

The circular from acting director of board of examinations and evaluation (SUK) GR Palase stated that earlier the last date to submit the exam form was September 14 with super late fee.

"However, many colleges, parents, students, and other stakeholders were regularly enquiring about the extension. Following this the university has decided to allow the acceptance of forms from September 18 to September 30. The colleges have been asked to submit the list of the students by October 1," the circular said, adding the forms getting submitted after the stipulated deadline will not be considered.

Meanwhile, in another circular, the SUK has asked the colleges to waive off the exam fees of flood-affected students. Colleges have been instructed to set up a separate cell to facilitate the students.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात सोमवारपासून राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** विद्यापीठात सोमवारी (दि. २३) व मंगळवारी 'मराठ्यांशी संबंधित युरोपियन शक्तींचे दख्खनमधील संक्रमण : राजकीय आणि परस्परावलंबन' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे.

छत्रपती शाहू महाराज सेंटर फॉर स्टडीज् ऑफ मराठा हिस्ट्री, सेंटर फॉर हिस्टॉरिक स्टडीज, जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च, सावित्रीबाई पुणे विद्यापीठाचा संरक्षण व रणनीती विभागातर्फे चर्चासत्राचे आयोजन केले आहे. 'जेएनयू'मधील इतिहास संशोधक विद्यार्थी अनिलकुमार, डॉली पुरोहित, अंकिता कुमार, शेले ख्रिस्तीन लॅम्ब्रे, अनुराधा, दीपिका सिंग, शिखा कुमारी, आदित्य शर्मा हे विवेचन करतील. पुणे विद्यापीठात २५ रोजी चर्चासत्र होईल, असे प्रा. उमेश कदम यांनी सांगितले.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 SEP 2019
लोकसत्ता

# मुंबई विद्यापीठाकडून माजी विद्यार्थ्यांना 'डायमंड ऑफ युनिव्हर्सिटी' पुरस्कार

**प्रतिनिधी, मुंबई**

**मुंबई विद्यापीठातून** शिक्षण घेऊन भारतासह जगभरात नावलौकिक कमाविणाऱ्या माजी विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून 'डायमंड ऑफ युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई' हा पुरस्कार दिला जाणार आहे. विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या विशेष कार्यक्रमात या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात येईल. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.

विद्यापीठातून शिक्षण घेऊन नावलौकिक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाची ओळख पटवून देण्यासाठी आणि त्यांच्या



उत्कृष्ट कामगिरीची दखल घेण्यासाठी हा पुरस्कार दिला जाणार आहे, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. 'मुंबई विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांनी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे, त्यामुळे या विद्यार्थ्यांचा यथोचित गौरव करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे,' असे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर यांनी सांगितले.

12 1 SEP 2019

लोकसत्ता

# राज्य सरकारची विश्वासार्हता विदेशात डागाळली

## संभावित शिष्यवृत्तीधारकांना प्रवेश देण्यास नकार

देवेश गोंडाणे, नागपूर

**राज्यातील अनुसूचित** जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण आणि संशोधनासाठी राज्य सरकारतर्फे देण्यात येणारी शिष्यवृत्ती संबंधित विद्यापीठांना वेळेत मिळत नसल्याने यावर्षी विद्यार्थ्यांना प्रवेशबंदी घालण्यात आली आहे. यासंदर्भातील सूचना देणारे ई-मेल राज्य सरकारला वेळोवेळी पाठवल्यानंतरही सरकारने दखल घेतली नसल्याने या विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात असून या प्रकारामुळे विदेशी विद्यापीठांमध्ये राज्य सरकारची विश्वासार्हता डागाळली आहे.

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून राजर्षी शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती देण्यात येते. मात्र, या शिष्यवृत्तीच्या नावाने शासनाने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची थट्टा मांडल्याचा आरोप अर्जदार विद्यार्थ्यांकडून होत आहे. सामाजिक न्याय विभागाकडून विदेशी विद्यापीठांना वेळेवर शिष्यवृत्तीचे पैसे दिले जात नसल्याने काही विद्यापीठांनी प्रवेश देण्यास असमर्थता दर्शवणारा ई-मेल विद्यार्थी आणि सामाजिक न्याय विभागाला पाठवला आहे. यूएनएसडब्ल्यू सिडनी, ऑस्ट्रेलिया या विद्यापीठातील प्रवेश गुंडाळला लागलेल्या तीन विद्यार्थ्यांनी यावर यावर सामाजिक माध्यमावर मोहीम सुरू केल्यानंतर सामाजिक न्याय विभागाने हालचाली सुरू केल्या आहेत. मात्र, आता प्रवेश मिळाला तरी या विद्यार्थ्यांना प्रथम सत्राचा प्रवेश गमवावा लागणार आहे.

सरकारच्या या धोरणाविरोधात विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड नाराजी असून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे पंख छाटण्याचा हा प्रकार असल्याचा आरोपही केला जात आहे. याविरोधात राजीव खोब्रागडे यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांनी समाज माध्यमावर मोहीम छेडल्यानंतर सामाजिक न्याय विभागाला जाग आली असून विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित केले जातील, असे आश्वासन देण्यात आले असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

### ही तर विद्यार्थ्यांची फसवणूक

'विदेशात शिक्षणाठी शिष्यवृत्ती देण्याच्या नावावर अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची सरकार फसवणूक करीत आहे. अनेक परिश्रमानंतर विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठात प्रवेश मिळतो. हा विद्यार्थ्यांचा अपमान आहे.

- राजीव खोब्रागडे, विद्यार्थी.

परदेशी शिक्षण घेणाऱ्या तीन विद्यार्थ्यांची तक्रार आमच्यापर्यंत आली होती. मात्र, या प्रकरणात मी प्रत्यक्ष लक्ष घालून विदेशी विद्यापीठांशी संपर्क साधला व त्या विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यास सांगितले. फेब्रुवारी २०२० पासून त्या विद्यार्थ्यांना विदेशी विद्यापीठात शिक्षण घेता येणार आहे. यासह परदेशी शिष्यवृत्ती वाटपात यापुढे अशा कुठल्याही समस्या निर्माण होऊ नये, असे आदेश संबंधितांना दिले आहेत.

- मिलिंद शंभरकर, आयुक्त, समाज कल्याण विभाग.



# नाइट कॉलेज तिसऱ्यांदा अजिंक्य

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर झोनल बास्केटबॉल स्पर्धेमध्ये नाइट कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्सने सलग तिसऱ्या वर्षी अजिंक्यपद मिळवले. शहाजी लॉ कॉलेजच्या बास्केटबॉल मैदानावर स्पर्धा पार पडली. स्पर्धेचे आयोजन नाइट कॉलेजने केले.

नाइट कॉलेजने न्यू कॉलेजवर ९ गुणांनी मात केली. केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला तिसरा क्रमांक मिळाला. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगला चौथा क्रमांक मिळाला. पारितोषिक वितरण विभागीय कामगार आयुक्त अनिल गुरव यांच्या हस्ते झाले. सहायक कामगार आयुक्त एन. डी. मुलाणी, गुन्हे शाखेचे प्रशिक्षक अभिजित ढवण, नाइट कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश फराकटे, दीपक देसाई, डॉ. शरद बनसोडे, विजय रोकडे, अमर सासने, अजित पाटील, डॉ. अरूण शिंदे, अभिजीत कांबळे, उपस्थित होते. पंच म्हणून संदीप खोत, अमित दलाल, रोहन नायकवडे, उदय पाटील आदींनी काम पाहिले.



**बिद्री : येथील दूधसाखर महाविद्यालयात बोलताना सत्यजित पाटील. शेजारी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय पाटील व प्राध्यापक.**

# दूधसाखर महाविद्यालयात व्याख्यान

**बिद्री :** ''आयुष्यात यशस्वी होण्यासाठी आई-वडील आणि गुरूंचा आदर्श समोर ठेवून वाटचाल केली, तर नक्कीच यशस्वी होता येते,'' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदकप्राप्त विद्यार्थी सत्यजित पाटील यांनी केले. ते येथील दूधसाखर महाविद्यालयात विज्ञान शाखेने आयोजित केलेल्या 'यशाचा मूलमंत्र' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय पाटील होते. पाटील यांचा सत्का र प्रा. डॉ. डी. डी. कोमेजवार यांच्या हस्ते झाला. कार्यक्रमाचे संयोजन पदार्थविज्ञान विभागप्रमुख प्रा. एच. डी. धायगुडे यांनी केले. अतुल नगरकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. आर. बी. चोपडे यांनी आभार मानले.